**<u>ठळक बातम्या</u>**

- विधानसभा निवडणुकीसाठी आज प्रचाराचा शेवटचा दिवस
- महाराष्ट्रात ५ लाख रोजगार निर्मितीची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे इतर राज्यात गेल्याचा राहुल गांधी यांचा आरोप
- धारावीचा पुनर्विकास झाल्यानंतर तिथल्या सर्व रहिवाशांना धारावीतच घर देण्याचं भाजपाचं आश्वासन

**आणि**

- जळगावात अपक्ष उमेदवारावर गोळीबार, देवळालीतल्या वंचित बहुजन आघाडीच्या उमेदवारावर हल्ला

**<><><><><>**

विधानसभा निवडणूक आणि लोकसभा पोटनिवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी आज संध्याकाळी थंडावेल. राज्यात यंदा ९ कोटी ७० लाखांहून अधिक मतदार २८८ आमदारांना निवडून देणार आहे. त्यांच्यासाठी १ लाख ४२७ मतदान केंद्र उभारली असून दुर्गम भाग वगळता इतर ठिकाणी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ पर्यंत मतदान होईल. विधानसभा निवडणुकीसाठी यंदा ४ हजार १३६ उमेदवार रिंगणात असून नांदेड लोकसभा पोटनिवडणुकीसाठी १९ उमेदवार पात्र ठरले आहेत.

विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात सुमारे ८० हजार जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई झाली. ५६ हजारांहून अधिक शस्त्र जमा

केली असून ६११ शस्त्र परवाने रद्द झाले आहेत. एकूण ६५५ कोटी रुपयांहून अधिक रकमेची मालमत्ता आचारसंहिता लागू झाल्यापासून जप्त झाली आहे. त्यात १५३ कोटी रुपये रोख, २८२ कोटी रुपयांचे मौल्यवान धातू यासह इतर गोष्टींचा समावेश आहे. आचारसंहिता भंग झाल्याच्या ८ हजार ३८६ तक्रारी राज्यात प्राप्त झाल्या असून ३३ वगळता इतर तक्रारी निकाली निघाल्या आहेत.

<><><><><>

राज्यात आज संध्याकाळी ६ वाजता प्रचार संपल्यानंतर प्रचारसभा, मिरवणुका आयोजित करता येणार नाही. आयोजित केल्यास आयोजक आणि सहभागी होणारे अशा दोघांवर गुन्हे दाखल होतील. यात दोन वर्षापर्यंत तुरुंगवास अथवा दंड अथवा दोन्ही अशा शिक्षेची तरतूद आहे, अशी माहिती मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयानं दिली आहे. या कालावधीत जाहिराती करतानाही नियमांचं पालन करण्याचे निर्देश आयोगानं उमेदवारांना आणि जाहिराती प्रसारण करणाऱ्यांना दिले आहेत. या निर्देशांचे उल्लंघन झालं तर न्यायालयाच्या आदेशाचा अवमान ग्राह्य धरून कार्यवाही करण्यात येईल, असंही मुख्य निवडणूक अधिकारी यांनी स्पष्ट केलं आहे.

<><><><><>

झारखंड विधानसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्याचा प्रचारही आज संध्याकाळी संपेल. या टप्प्यात ३८ मतदारसंघात मतदान होणार आहे. त्यापूर्वी विविध राजकीय पक्षांनी प्रचारासाठी जोर लावला आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात ऑक्टोबरसाठी जीएसटी अर्थात वस्तू आणि सेवा कर परतावा ३ बी भरण्याची मुदत महाराष्ट्र आणि झारखंड या राज्यांमधे एका दिवसानं

म्हणजे २१ तारखेपर्यंत वाढवण्याचा निर्णय सरकारनं घेतला आहे. जीएसटी अंमलबजावणी समितीच्या मान्यतेनंतर सरकारनं हा निर्णय घेतला आहे.

**<><><><><>**

राज्यातल्या ५ लाख युवांना रोजगार देण्याची क्षमता असलेले ७ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सत्ताधारी महायुतीमुळे महाराष्ट्रातून गुजरातला गेल्याचा आरोप काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाच्या विधानसभा निवडणुकीत रोजगार, महागाई, महिलांचे प्रश्न यासह महाराष्ट्राची संपत्ती महाराष्ट्राच्या जनतेला मिळणं हेच महत्त्वाचे मुद्दे आहेत, असं सांगून त्यांनी महाविकास आघाडीच्या जाहीरनाम्यातल्या आश्वासनांचा पुनरुच्चार केला. धारावी पुनर्विकास प्रकल्पासह विमानतळं, संरक्षण उत्पादनं, बंदरं इत्यादींची कंत्राटं उद्योगपती गौतम अदानी यांच्या कंपनीला मिळाल्यावरून त्यांनी सरकारवर टीका केली. धारावीचा पुनर्विकास स्थानिकांचं हित लक्षात घेऊन केला जाईल. हा मुद्दा त्यापेक्षा व्यापक आहे, खारफुटीचं जंगल, मुंबईत येणारा पूर यावरही उपाय करणं गरजेचं असल्याची बाब त्यांनी अधोरेखित केली.

**होल्ड बाइट**

भारतीय जनता पार्टी ईडी, सीबीआय, आयकर विभाग इत्यादीचा गैरवापर करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

**<><><><><>**

महायुती सरकारच्या काळात मेट्रोच्या रंगरंगोटीत घोटाळा झाल्याचा आरोप शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी आज केला. मुंबईत वांद्रे इथं झालेल्या वार्ताहर परिषदेत ते बोलत होते. हा घोटाळा मुख्यमंत्र्यांच्या खात्यात झाला असल्याचंही ते म्हणाले. मुंबईत सुरू असलेल्या

मेट्रोच्या कामात, मेट्रोमार्गाचे खांब काम पूर्ण होण्याआधीच रंगवण्यात आले आहेत. त्यासाठी ७४ कोटी ४१ लाख रुपये वापरले गेले असल्याचा आरोप आदित्य ठाकरे यांनी केला.

**<><><><>**

धारावीचा पुनर्विकास झाल्यानंतर तिथल्या सर्व रहिवाशांना धारावीतच घर देण्यात येईल, असं भाजपा नेते विनोद तावडे यांनी सांगितलं. धारावीतल्या लोकांना विस्थापित करण्यात येणार आहे, या काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या आरोपांना उत्तर देताना ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. धारावीची जमीन अदानी समूहाला दिली जाणार नाही, ती राज्य शासनाच्याच ताब्यात राहील, असं तावडे यांनी स्पष्ट केलं. अदानी समूहाचा उदय यूपीएच्याच काळात झाला असं तावडे म्हणाले. धारावीच्या पुनर्विकासासाठी अदानी समूह आणि अबुधाबीतले शेख यांची भागीदारी असणाऱ्या सेकलिंग कंपनीत स्पर्धा होती. यात निकष पूर्ण केल्यानं अदानी समूहाला ही निविदा मिळाली. पण शेख यांच्या कंपनीला निविदा मिळाली नाही म्हणून राहुल गांधी विरोध करत आहेत का, असा प्रश्न तावडे यांनी उपस्थित केला.

**<><><><>**

जगात भारत पाचव्या क्रमांकाची सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. आता महाराष्ट्राची अर्थव्यवस्था १ ट्रिलियन इतकी बनवायची असेल तर महायुतीला मतदान करावं, असं आवाहन केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी आज नवी मुंबईत केलं. यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि महायुतीचे वरिष्ठ नेतेही उपस्थित होते.

**<><><><>**

महायुतीला जनतेला कौल असल्यानं युतीच्या १६५ पेक्षा जागा निवडून येतील आणि सरकार आपलंच येईल, असा विश्वास भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला. नागपूरात ते वार्ताहरांशी बोलत होते.

**होल्ड - बाईट -बावनकुळे**

काँग्रेसने लोकसभेत खोटा प्रचार केला असून त्यावर जनतेचा विश्वास उरला नाही, त्यामुळे हरियाणात झालं तसंच महाराष्ट्रात होईल, असा दावा त्यांनी केला.

**<><><><><>**

गोवा राज्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी आज अकोल्यात भाजपाच्या उद्योग आघाडीची बैठक घेऊन भाजपाच्या उमेदवारांना निवडून आणण्याचं आवाहन केलं.

**<><><><><>**

जळगाव शहर विधानसभा मतदारसंघातले अपक्ष उमेदवार शेख अहमद हुसैन गुलाम हुसेन यांच्या घरावर आज पहाटे अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. घराच्या बाहेरुन गोळीबाराचा आवाज ऐकल्यावर हुसेन यांनी तपासणी केली, त्यावेळी खिडकीच्या काचेवर गोळ्या झाडल्याची छिद्रं आढळली. खबर मिळताच निवडणूक विभागाचे आणि जिल्हा पोलीस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. पुढील तपास सुरु आहे.

वंचित बहुजन आघाडीचे देवळाली, इथले उमेदवार अविनाश शिंदे यांच्यावर काल रात्री हल्ला झाला. नाशिक ग्रामीणच्या पोलीस अधीक्षकांना तातडीने या प्रकरणात लक्ष घालून आरोपींना तातडीने अटक करावी, अशी मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

**<><><><><>**

नाशिक जिल्ह्यात सिन्नर विधानसभा मतदारसंघातले महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार शरद शिंदे यांची पक्षानं हकालपट्टी केली आहे. शिंदे यांना उमेदवारी दिली होती मात्र ते पक्ष शिस्तीचं पालन न करता, नेत्यांना विश्वासात न घेता चुकीच्या पद्धतीनं प्रचार करत असल्याचं पक्षाचे उत्तर महाराष्ट्र सचिव ज्ञानेश्वर थोरात यांनी प्रसिद्धीपत्रकात म्हटलं आहे.

**<><><><><>**

विधानसभा निवडणुकीसाठी गडचिरोली जिल्ह्यातल्या संवेदनशील आणि अतिसंवेदनशील मतदान केंद्रांवर मतदान पथकं कालपासून रवाना होऊ लागली. सुरक्षेच्या दृष्टीने अतिसंवेदनशिल ३७ मतदान केंद्रं सुरक्षित ठिकाणी स्थानांतरित करण्यात येणार आहेत. केंद्रीय राखीव दल आणि राज्य शासनाचे पोलिस अशा एकूण १११ कंपन्यांचे १७ हजार पोलिस मतदानाच्या दिवशी तैनात असणार आहेत. मतदानाच्या दिवशी १३० ड्रोन नजर ठेवणार आहेत. निवडणूक प्रक्रियेसाठी वायुसेनेची ५ हेलिकॉप्टर मदतीला आहेत. दोनशेहून अधिक संवेदनशील मतदान पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सुरक्षितरित्या पोहविण्यात येत आहे.

**//<><><><><>//**